**निशाण क. ५८ वरील आदेश**

वादीने सदरचा अर्ज दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द् दावा मिळकतींचे सरस निरस व रहारास्त वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ याने कैफियत दाखल करून रावजी यांना गणपत, लक्ष्मण, महादेव यांचेखेरीज जनाबाई नावाची एक मुलगी होती, तिला किंवा तिचे वारसांना दाव्याचे कामी पक्षकार न केलेची तक्रार केली आहे. वादी, प्रतिवादींमधील वादाचे अंतिम निराकरण होण्याच्या दृष्टीने या दाव्याचे कामी जनाबाईचे वारस पक्षकार म्हणून सामिल करणे गरजेचे आहे. या दुरूस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरूपात कोणताही फरक पडणार नाही. उलट वादी व प्रतिवादींमधील वादाचे अंतिम निराकरण होण्याच्या दृष्टीने मदतच होणार आहे. सबब, जनाबाईचे वारस पक्षकार म्हणून सामिल करणेची परवानगी देवून तशी दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर अर्ज मंजूर करणेस हरकत असल्याचे नमूद केली आहे.

३. वादी, प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता दाखल करणेत आला आहे असे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ याने कैफियतीमध्ये रावजी यांना जनाबाई नावाची मुलगी होती, तिला किंवा तिचे वारसांना या दाव्यात पक्षकार केले नसल्याची तक्रार उपस्थित केली आहे. आवश्यक पक्षकार अभावी वाटपाच्या हुकूमनाम्याची अमलबजावणी होवू शकत नाही. त्यामुळे सदर पक्षकारांना या

दाव्यामध्ये समाविष्ट करण्याच्या दुरूस्तीस परवानगी देणे न्यायोचित वाटते. प्रस्तुत कामी मुद्दे निश्चित करण्यात आले नाहीत. तसेच पुराव्याचे कामकाज अद्याप चालू झाले नाही. प्रस्तुत दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलणार नाही असे मला वाटते. या दुरूस्तीमुळे प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. या सर्व कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी याने पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक ०७/०३/२०१८